**ASHA KULKARNI**

HON. GEN. SECRETARY
ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY

**ANTI-DOWRY MOVEMENT, BOMBAY**
4/50, Vishnu Prasad 'B' CHS, Shahaji Raje Marg,
Freedom Fighter Mamasaheb Kulkarni Chowk,
Vile Parle (East), Mumbai - 400 057.
Tel.: 022-26836834 / Telefax : 022-26836132
Mob.: 9819373522 / 9819539193
E-mail : antidowry498a@gmail.com
Website : www.antidowrymovement.com

# " शलाका " पारितोषिक प्राप्त लघुकथांचा संग्रह

विलेपार्ले, मुंबई येथील सामाजिक संस्था हुंडाविरोधी चळवळीने १ मे २०२२ रोजी पन्नाशीत पदार्पण केले. म्हणजेच १ मे रोजी सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु झाले. अर्थात चळवळीच्या दृष्टीने ही बाब काही आनंदाची किंवा उत्सव साजरा करावा अशी अजिबात नाही. परंतु जाणीव जागृतीचे कार्य अधिक जोमाने करण्याची गरज आहे. चळवळ त्या दिशेने सतत ५० वर्षे प्रयत्नरत आहेच. या अभियानात आम जनतेच्या सहभागासाठी जे विविध उपक्रम चळवळीने राबवले त्यात राज्यस्तरीय निबंध, लघुकथा लेखन स्पर्धांचे आयोजन हा एक चाळीस वर्षांहून अधिक काळ राबवलेला उपक्रम.

विविध सामाजिक विषयांवर अभ्यास करण्यास समाजातील विविध घटकांना प्रवृत्त करून समाजात एक विचारमंथन व्हावे या दृष्टीने आजपर्यंत अनेक विषयांवर साहित्य स्पर्धा चळवळीने आयोजित केल्या. १९८० साली पहिली निबंध स्पर्धा आयोजित केली होती त्या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ साहित्यिक श्री व. पु. काळे यांनी केले होते. त्यानंतर हा उपक्रम अखंड अव्याहत पणे दरवर्षी राबवला गेला. या स्पर्धांचे परीक्षण करण्याचे अतिशय महत्वाचे आणि कठीण कार्य करून संस्थेला अत्यंत मोलाचे असे सहकार्य करण्यात अनेक विद्वान विचारवंत,प्राध्यापक, लेखक, साहित्यिकांचा सिहांचा वाटा आहे. यांत पद्मश्री मधू मंगेश कर्णिक, व.पु.काळे, डॉ. व.दि.कुलकर्णी, डॉ. मृणालिनी देसाई, डॉ. पां. वि. चंद्रात्रे, डॉ. प्र. द. पुराणिक, राजा राजवाडे, डॉ. आसावरी भट, मंगला गोखले, डॉ. लीना वनमाळी, प्रा. शैलजा सांगळे अशा अनेक दिग्गज व्यक्तींचा समावेश आहे.

*मागील दहा वर्षात चळवळीने तीन लघुकथा लेखन स्पर्धा आयोजित केल्या.*

*(१) वर्ष २०१४ - विषय : हुंडा व तत्सम इतर अपप्रवृत्तींमुळे पुरुषप्रधान समाजात स्त्रियांवर होणारे अत्याचार. सत्यघटनांवर आधारित कथा. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ लेखिका व रंगकर्मी डॉ. चारुशीला ओक यांनी केले होते. चारुताईंनी माधवी कुंटे यांच्या साथीने कथा क्लब सुरु केला होता. त्यात या दोन्ही लेखिका नवोदित कथा लेखकांना कथा लेखनासाठी मार्गदर्शन करीत. या कथा क्लब मधून अनेक यशस्वी कथा लेखिका घडल्या. या स्पर्धेत चंद्रपुरच्या वर्षा चौबे यांची " वैदेही " ही कथा महाराष्ट्राच्या १७ विविध जिल्ह्यांमधून दाखल झालेल्या ५२ लघु कथांमधून सर्वोत्कृष्ट कथा ठरली.*

*(२) वर्ष २०१६ - विषय : समाजात हिंसाचार ,क्रौर्य आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचे जाणवते या परिस्थितीत सकारात्मक उपाय योजणे व मार्ग काढणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर " माणसा माणसा कधी होशील माणूस " या आशयाची स्वानुभवावर आधारित अथवा काल्पनिक लघुकथा. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ लेखिका माधवी कुंटे यांनी केले, त्यांचे मनोगत कथासंग्रहाच्या सुरुवातीला समाविष्ट करण्यात आले आहे. या स्पर्धेत मालाड, मुंबईच्या मीना पाटकर यांची " पुतळा " ही कथा महाराष्ट्राच्या १५ विविध जिल्ह्यातून दाखल झालेल्या १४५ लघु कथांमधून सर्वोत्कृष्ट कथा ठरली.*

*(३) वर्ष २०१९ - विषय : " स्त्री जीवनातील संघर्ष आणि त्यावर केलेली यशस्वी मात " या विषयावर लघुकथा. या स्पर्धेचे परीक्षण ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिका गौरी कुलकर्णी यांनी केले. त्यांचेही मनोगत वाचकांना वाचता येते. या स्पर्धेत माहीम मुंबईच्या रेखा नाबर यांची " मुखवटा " ही कथा महाराष्ट्राच्या १७ जिल्ह्यातून दाखल झालेल्या ११५ लघु कथांमधून सर्वोत्कृष्ट ठरली. विशेष उल्लेख करायचा म्हणजे महाराष्ट्राच्या माजी निवडणूक आयुक्त - सनदी अधिकारी नीला सत्यनारायण यांची सुद्धा एक बक्षिसपात्र कथा " नियती " या कथासंग्रहात आहे.*

*वरील तिन्ही स्पर्धांमधील बक्षिसपात्र कथांचा संग्रह संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षा निमित्ताने प्रकाशित करण्यात आला. सर्वोत्कृष्ठ प्रथम क्रमांकांच्या लघुकथांव्यतिरिक्त तिन्ही विषयांतील प्रथम पांच क्रमांकांच्या अशा एकूण १७ लघुकथा या संग्रहात समाविष्ट आहेत. या कथासंग्रहाचे वैशिष्ठ्य म्हणजे ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधू मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच पंधरा वर्षांच्या नवोदित कलाकाराने निहार पाटील याने त्याचा मामा समीर बोन्द्रे याची कल्पना चित्रात उतरवली आहे. प्रेरणादायी साहित्य म्हणून या कथासंग्रहाला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा आहे.*

*संपादक - आशा कुलकर्णी*
*महासचिव - हुंडाविरोधी चळवळ, मुंबई.*